आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१८ ऑगस्ट २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- निवडणूक आयोगाकडून SIR ला पुन्हा मुदतवाढ, महाराष्ट्रात प्रारुप मतदारयादी ३१ ऑगस्टला तर अंतिम मतदारयादी ४ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार

- समाज माध्यमांचा वापर जनतेचं म्हणणं ऐकून घेण्यासाठीही करण्याचा राष्ट्रपतींचा सल्ला

- धनुष्यबाण हे पक्षचिन्ह आम्हाला देणार नसाल तर गोठवा अशी उद्धव ठाकरे यांची सर्वोच्च न्यायालयात मागणी

- झारखंडमध्ये सुरू असलेलं आंदोलन मागे घेण्याचा विद्यार्थ्यांचा निर्णय

**आणि**

- श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात भारतीय संघ विजयी

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं राज्यातल्या SIR अर्थात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेला तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली आहे. नव्या वेळापत्रकानुसार आता २४ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध होईल. त्यावर ३० सप्टेंबरपर्यंत हरकती आणि दावे दाखल करता येतील. हे दावे २९ ऑक्टोबरपर्यंत निकाली काढले जातील आणि ४ नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल.

**<><><><><>**

समाजमाध्यमांचा वापर केवळ माहिती देण्यासाठी न करता जनतेचं म्हणणं ऐकून घेण्यासाठी देखील करावा असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. भारतीय माहिती सेवेतल्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या तुकडीने आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपती भवनात जाऊन राष्ट्रपतींची भेट घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

तंत्रज्ञानाचा वापर जबाबदारीने झाला पाहिजे,कारण कोणत्याही माहितीला प्रतिसाद देण्याची पद्धत आता मोठ्या प्रमाणावर बदलली आहे, त्यामुळे त्यातून जनतेच्या आशा आकांक्षा, अपेक्षा, आणि चिंता समजून घेण्याचा प्रयत्न करा असा सल्ला राष्ट्रपतींनी दिला.

<><><><><>

केंद्रीय मंत्रिमंडळानं आज रेल्वेच्या चार प्रकल्पांच्या विस्तारीकरणाला आणि महामार्गाच्या एका प्रकल्पाला मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर बातमीदारांना ही माहिती दिली. या प्रकल्पांना एकूण १३ हजार ४१ कोटी रुपये खर्च येणार असून त्याचा लाभ पश्चिम बंगाल,ओडिशा, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश या राज्यांना मिळणार आहे.

<><><><><>

स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या युवावर्गाला मोफत ऑनलाइन प्रशिक्षण देण्याच्या घोषणेच्या अंमलबजावणी संदर्भात केंद्रीय शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज आढावा बैठक घेतली. प्रधानमंत्र्यांनी १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरच्या भाषणात ही घोषणा केली होती.

<><><><><>

शिवसेनेचं धनुष्य बाण हे पक्ष चिन्ह आम्हाला देणार नसाल तर गोठवा अशी मागणी उद्धव ठाकरे यांचे वकील कपील सिब्बल यांनी आज सर्वोच्च न्यायालयात केली. शिवसेना हे पक्षाचं आणि पक्ष चिन्हाच्या बाबत सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान त्यांनी ही मागणी केली. शिवसेना ही ठाकरेंचीच आहे आणि पक्षाचं नाव आणि पक्षचिन्ह एकनाथ शिंदे यांना देणं हा ठाकरेंवर अन्याय असल्याचं सिब्बल म्हणाले.

आमदारांची पात्रता विधानसभा अध्यक्षांनी स्पष्ट केलेली नसताना विधीमंडळ पक्षातल्या बहुमताच्या आधारे निवडणूक आयोगानं निर्णय देणे गैर असल्याचा युक्तीवाद उद्धव ठाकरे यांच्या वतीनं वकील देवदत्त कामत यांनी केला. त्यावर विधानसभा अध्यक्षांचा निर्णय बदलू शकतो का असा सवाल सर्वोच्च न्यायालयानं केला. अध्यक्षांनी न्यायाधीकरणाच्या रुपातून निकाल दिल्यानं तो बदलण्याचा पूर्ण अधिकार सर्वोच्च न्यायालयाला असल्याचं कामत यांनी लक्षात आणून दिलं. त्यावर विधानसभा अध्यक्षांनी घेतलेला निर्णय कायद्यानुसार नसेल तर तो बदलू असं निरीक्षण न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी नोंदवलं.

**<><><><><>**

वैध विमा नसलेल्या वाहनांना पेट्रोल पंपांवर इंधन नाकारण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पाबाबत आपल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्याचे आदेश आज सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारला दिले. थर्ड पार्टी विमा संरक्षण नसताना रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांच्या मोठ्या संख्येबाबत न्यायालयानं चिंता व्यक्त केली होती आणि या वाहनांना इंधन नाकारण्याचे आदेश ३ ऑगस्टला दिले होते.

**<><><><><>**

नीट यूजी फेरपरीक्षेतल्या उमेदवारांच्या मूळ गुणपत्रिकेत कोणताही फेरफार झाला नसल्याचं महाधिवक्ता तुषार मेहता यांनी दिल्ली उच्च न्यायालयात सांगितलं. फेरपरीक्षेतल्या गुणपत्रिकांमध्ये फेरफार झाल्याचा आरोप करणाऱ्या जनहित याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि तेजस कारिया यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. फेरपरीक्षेतल्या कुठल्या गुणपत्रिकेत फेरफार झालेला नसून अशा प्रकारचा चुकीचा समज निर्माण होऊ नये, अशी विनंतीही त्यांनी न्यायालयाला केली.

नीट परीक्षांमधे रचनात्मक सुधारणा आवश्यक असून त्याकरता नेमलेल्या राधाकृष्णन आणि नंदन नीलकेणी समित्यांच्या शिफारशींवरचा कृती अहवाल सादर

करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज एनटीए म्हणजे राष्ट्रीय परीक्षा संस्थेला दिले. यासंदर्भात फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडीकल असोसिएशनने दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी न्यायमूर्ती पीएस नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पीठासमोर सुरु आहे. नीट परीक्षेच्या सुरक्षेसाठी केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती महाअधिवक्ता तुषार महेता यांनी न्यायालयाला दिली. मात्र या प्रवेश परीक्षेत संस्थागत बदल करण्याची शिफारस राधाकृष्णन समितीने केली होती त्याच्याशी  न्यायालयाने सहमती दर्शवली.

**<><><><><>**

महिला अधिकाऱ्यांना स्थायी कमिशन देण्यासंदर्भात ठोस भूमिका घेऊन निश्चित धोरण आखण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने तटरक्षक दलाला दिले आहेत. १४ वर्षांची शॉर्ट कमिशन सेवा पूर्ण करणाऱ्या प्रियंका त्यागी या अधिकारी महिलेने स्थायी कमिशनची नेमणूक मिळावी याकरता सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. त्यावर दोन आठवड्यात निर्णय घ्यावा असे निर्देश सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही मोहना यांच्या पीठानं दिले आहेत.

**<><><><><>**

झारखंडमध्ये भर्ती परीक्षांमधल्या घोटाळ्याप्रकरणी सुरू असलेलं आंदोलन विद्यार्थ्यांनी मागे घेतलं आहे. २६ दिवसांपासून हे आंदोलन सुरू होतं. राज्य सरकारनं २२ भर्ती परीक्षा रद्द करण्याचा आणि ४५ परीक्षांमधल्या गैरप्रकारांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी भर्ती आयोगाकडून या परीक्षा घेतल्या जातात. त्यानंतर आंदोलकांनी हा निर्णय घेतला आहे. या चौकशीमध्ये समाधानकारक प्रगती झाली नाही तर २ महिन्यांनी पुन्हा आंदोलन करायचा इशारा या आंदोलकांनी दिला आहे.

दरम्यान, सरकारनं परीक्षा रद्द केल्याचा २ हजार ६२८ उमेदवारांना फटका बसण्याची शक्यता आहे. ते सध्या सरकारमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत. त्यामुळं त्यांनी झारखंड सचिवालयासमोर निदर्शनं केली. सर्व प्रक्रीया रद्द करण्याऐवजी केवळ दोषींवर कारवाई करा अशी त्यांची मागणी आहे.

<><><><><>

श्रीलंकेत गॉल इथं खेळलेल्या ६००व्या क्रिकेट कसोटी सामन्यात आज भारतानं विजय मिळवला.  पहिल्या डावात ४६२ आणि दुसऱ्या डावात १९३ धावा करणाऱ्या भारतीय संघानं श्रीलंकेला ३७२ धावांचं आव्हान दिलं होतं. काल दिवसअखेर श्रीलंकेची स्थिती ४ बाद ८४ अशी झाली होती. पहिल्या डावात ४ गडी बाद करणाऱ्या मानव सुतारने दुसऱ्या डावात श्रीलंकेच्या ६ फलंदाजांना तंबूत परत पाठवलं. श्रीलंकेचा दुसरा डाव  २०६ धावांवर आटोपला.

<><><><><>

BWF बॅडमिंटन विश्वविजेतेपद स्पर्धेत भारताचा उदयोन्मुख खेळाडू आयुष शेट्टी पुरुष एकेरीच्या तिसऱ्या फेरीत पोहोचला आहे. त्यानं आज दुसऱ्या फेरीत श्रीलंकेच्या दुमिंदू अबेविक्रमाचा २१-८, २१-१० असा सरळ गेम्समध्ये पराभव केला. नवी दिल्लीत इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर ही स्पर्धा सुरू आहे.

लक्ष्य सेनला मात्र दुसऱ्या फेरीत अमेरिकेच्या गॅरेट टॅनकडून पराभव पत्करावा लागला. लक्ष्यनं पहिला गेम २१-१९ असा जिंकला, पण त्यानंतरच्या दोन गेम्समध्ये त्याला १९-२१ आणि १७-२१ असा पराभव स्वीकारावा लागला.

महिला एकेरीत चुरशीच्या लढतीत उन्नती हुडाही कॅनडाच्या मिशेल ली हिच्यापुढं पराभूत झाली. उन्नतीनं पहिला गेम २१-११ असा जिंकला, मात्र त्यानंतरचे दोन गेम्स ती ९-२१ आणि २१-२३ अशा फरकानं हरली. पुरुष दुहेरीत भारताच्या हरिहरन अमसाकरुणन आणि एम. आर. अर्जुन या जोडीचं आव्हानही संपुष्टात आलं. त्यांना दुसऱ्या फेरीत कोरियाच्या जोडीकडून पराभव पत्करावा

लागला. मिश्र दुहेरीत भारताच्या ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो या जोडीनं स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. सात्विकसाईराज रन्कीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनंही 'वॉकओव्हर' मिळाल्यामुळे उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

**//<><><><><>//**